# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.12.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून 71 हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वितरण करणार.
- पंतप्रधान मोदी यांच्या कुवेत दौऱ्यादरम्यान उभय देशांमध्ये संरक्षण सहकार्यासह चार महत्त्वपूर्ण करार.
- राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन
- पाकिस्तान क्रिकेट मंडळाकडून 2025 च्या आयसीसी चॅंपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब आमिरात या देशाची निवड आणि
- महिला क्रिकेटमध्ये एकदिवसीय सामन्यांमध्ये एका वर्षात सर्वाधिक धावा करण्याचा स्मृती मानधनाचा विक्रम

**नियुक्तीपत्रं वितरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून 71 हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वितरण करणार आहेत. ते या प्रसंगी उपस्थितांशी संवादही साधणार आहेत. देशभरात 45 ठिकाणी रोजगार मेळ्यांचं आयोजन केलं जात असून, त्यात हे वितरण केलं जाणार आहे. ऑक्टोबर 2022 मध्ये रोजगार मेळ्यांना सुरूवात झाली आणि देशात आत्तापर्यंत असे तेरा मेळे आयोजित करण्यात आले आहेत. त्याच्या माध्यमातून विविध खाती आणि मंत्रालयांमधल्या रिक्त पदांवर लाखो जणांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. आज होणारी भरती ही गृह, टपाल, उच्चशिक्षण, आरोग्य आणि कुटुंबकल्याण, वित्त आणि इतर विभागांमध्ये होणार आहे.

**भारत-कुवेत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला कुवेत दौरा आटोपून काल भारतात परतले. त्यांच्या या भेटीत संरक्षण सहकार्यासह चार महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. सर्वसमावेशक संरक्षण सहकार्य करारात द्विपक्षीय लष्करी सहकार्यासाठी प्रणाली निश्चित करण्याचा समावेश आहे. त्यात प्रशिक्षणं, संयुक्त लष्करी सराव,

संरक्षण उद्योग विकासात सहकार्य अशा गोष्टींचा समावेश आहे. भारत आणि कुवेत यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण करारही करण्यात आला आहे. त्यामुळे नृत्य, संगीत, साहित्य आणि रंगभूमी या क्षेत्रातील प्रतिभावंतांना एकमेकांच्या देशांमध्ये जाता येणार आहे. क्रीडा सहकार्य कार्यक्रम 2025 ते 2028 या काळात होणार असून, या क्षेत्रातील ज्ञान आणि अनुभव यांची दोन्ही देश एकमेकांना देवाणघेवाण करतील. कुवेतनं आंतरराष्ट्रीय सौर आघाडीत सहभागी होण्याबाबतही करार केला आहे. त्यामुळे उभय देश सौर ऊर्जेच्या क्षेत्रात एकत्रपणे काम करू शकणार आहेत. भारत आणि कुवेत या दोन्ही देशांनी सीमेपलीकडच्या दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाचा एकमुखानं निषेध केला आहे. दहशतवादाशी लढण्यासाठी दोन्ही देश सहकार्य वाढवतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल कुवेतच्या द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. कुवेतचे आमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.

**चर्च- पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नाताळ उत्सवात सहभागी होणार आहेत. भारतीय कॅथोलिक बिशप्स परिषदेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ख्रिस्ती समाजाचे प्रमुख नेते, चर्चचे कार्डिनल्स आणि बिशप्स यांच्याशी चर्चा करतील. कॅथोलिक चर्चच्या मुख्यालयातील पंतप्रधानांची हा पहिलाच कार्यक्रम आहे.

**राष्ट्रीय शेतकरी दिन**

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाची प्रगती आणि विकासामध्ये शेतकऱ्यांच महत्व आणि भागिदारी अधोरेखित करणं, अन्न सुरक्षा, शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी परंपरा जपण्यासाठी शेतकऱ्यांचं योगदान कसं महत्वाचं आहे यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो. शेतकऱ्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून सरकारने त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी आणि शाश्वत कृषी विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशात यंदा विक्रमी 332 दशलक्ष टनापेक्षा जास्त अन्नधान्याचं उत्पादन झाले आहे. 329 दशलक्ष टन इतकं होतं. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांचा जयंतीदिन शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो.

**जगदीप-धनखड**

शेतकरी आणि त्यांचं कुटुंब स्वयंपूर्ण होण्यासाठी विपणन, मूल्यवर्धन आणि समूह शेतीसाठी प्रयत्न करतील तेव्हाच गावाची अर्थव्यवस्था उंचावू शकते असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी

काल केलं. चौधरी चरणसिंह पुरस्कार 2024 च्या विजेत्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.  चौधरी चरणसिंह यांनी ग्रामीण विकास, शेतकरी कल्याण आणि सर्वसमावेशक विकासासाठी अथक प्रयत्न केले असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

**सर्बिया निदर्शनं**

सर्बियात बेलग्रेडमध्ये काल 29 हजारपेक्षा जास्त जणांनी एकत्र येऊन सरकारविरोधात निदर्शनं केली. गेल्या काही वर्षांमध्ये या देशात झालेलं हे सर्वांत मोठं आंदोलन ठरलं आहे. नोव्ही सॅड इथल्या रेल्वेस्थानकाचं छत कोसळून पंधरा जणांचा मृत्यू झाल्यानंतर त्या देशभरात निदर्शनं सुरू आहेत. या स्थानकाचं दोन वेळा नूतनीकरण होऊनही हा अपघात झाला आहे. भ्रष्टाचार वाढल्यामुळे आणि निकृष्ट कामांमुळे हा अपघात झाल्याचा निदर्शकांचा आरोप आहे. वाढणारी निदर्शनं म्हणजे सर्बियाचे अध्यक्ष अलेक्झांडर व्हुसिक यांच्या नेतृत्वाला आव्हान असल्याचं सांगितलं जात आहे.

**इस्त्रायल-हल्ला**

इस्त्रायलनं गेल्या 24 तासांत गाझापट्टीत केलेल्या हल्ल्यात किमान 32 पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले आणि 54जण जखमी झाले आहेत, अशी माहिती गाझाच्या आरोग्य मंत्रालयानं दिली आहे.  दोहा इथं आंतरराष्ट्रीय स्तरावर इस्रायल आणि हमास यांच्यादरम्यान शस्त्रसंधीसाठी प्रयत्न होत आहेत. कतार, इजिप्त आणि अमेरिकेच्या मध्यस्थीनं दोन्ही देशांमध्ये अप्रत्यक्ष चर्चा गेल्या आठवड्यात दोहा इथं झाली. गेल्या वर्षी 7 ऑक्टोबरपासून गाझा युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत मृतांची संख्या 45 हजारच्या पुढे गेली आहे, अशी माहिती गाझामधील हमासच्या नेतृत्वाखालील आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. दरम्यान, इस्रायलच्या तेल अवीव-जाफा भागात हौथी क्षेपणास्त्र हल्ल्यात १४ जण जखमी झाल्यानंतर अमेरिकी लष्करानं येमेनची राजधानी सनावर हवाई हल्ले केले.

**सुशासन कार्यशाळा**

कर्मचारी, सार्वजनिक गाऱ्हाणी आणि निवृत्तिवेतन विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्रसिह आज नवी दिल्लीत चांगल्या प्रशासनासाठीच्या राष्ट्रीय कार्यशाळेचं उद्घाटन करणार आहेत. विविध मंत्रालयं आणि खात्यांमधले अधिकारी या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. गेल्या चार वर्षांमधली ही अशा प्रकारची चौथी कार्यशाळा आहे. 19 ते 25 डिसेंबर या काळात सुशासन सप्ताह साजरा केला जातो. त्याचा एक भाग म्हणून या कार्यशाळेचं आयोजन केलं जात आहे.

**पाकिस्तान निर्णय**

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं 2025 च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब आमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक

कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब आमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत. त्या देशात कोणत्या ठिकाणी हे सामने होणार हे पाकिस्तान क्रिकेट मंडळानं स्पष्ट केलं नसलं, तरी दुबईमध्ये हे सामने होतील, अशी शक्यता आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजे आयसीसीसाठी स्पर्धेचं वेळापत्रक निश्चित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

**स्मृती मानधना**

महिला क्रिकेटमध्ये एकदिवसीय सामन्यांत एका वर्षात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्मृती मानधनानं नोंदवला आहे. काल वडोदरामध्ये वेस्ट इंडिज संघाबरोबर झालेल्या सामन्यात स्मृतीनं 91 धावा केल्यामुळे तिनं या वर्षी केलेल्या धावांची संख्या 1602 झाली आहे. त्यामुळे स्मृतीनं दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोलवार्टचा 1593 धावांचा विक्रम मोडला आहे. स्मृतीनं केवळ 36 सामन्यांमध्ये हा विक्रम केला आहे. तिनं वीस षटकांच्या सामन्यांमध्ये एका वर्षात सर्वाधिक म्हणजे 736 धावा करण्याचाही विक्रम यापूर्वीच केला आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज महिला क्रिकेट संघांमध्ये काल झालेला सामना भारतानं 211 धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं 50 षटकांत 9 गडी बाद 314 धावा केल्या. पाहुण्या वेस्ट इंडिजचा संघ मात्र 27 व्या षटकांत अवघ्या 103 धावातच गारद झाला. रेणुका ठाकूर सिंगनं 10 षटकांत केवळ 29 धावा देत 5 फलंदाज बाद केले.

**थंडी लाट**

हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाखच्या काही भागांमध्ये आज थंडीची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. हरियाणा, ओडिशा, राजस्थान, मणिपूरमध्ये रात्री आणि पहाटे दाट धुकं असेल, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे. दिल्ली-एनसीआर परिसरात धुकं आणि धुरकं पुढचे दोन दिवस कायम राहील, असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार